# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक: 07.04.2024** **वार: रविवार**

---

**योग महोत्सव**

आंतरराष्ट्रीय योग दिन 75 दिवसांवर आलेला असताना आता त्याची उलटगणना सुरू होत आहे. यानिमित्त पुण्यामध्ये वाडिया महाविद्यालयाच्या क्रीडांगणात आज योग महोत्सव घेण्यात आला. योगप्रेमींनी या महोत्सवाला मोठा प्रतिसाद दिला. राष्ट्रीय निसर्गोपचार संस्था आणि मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थेनं संयुक्तपणे याचं आयोजन केलं होतं.

**प्रचार जाहीर नामा**

पुणे शहर आणि जिल्ह्यात लोकसभा निवडणुकांच्या प्रचाराचा जोर आता वाढला आहे. बारामती मतदारसंघाच्या महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार आणि पुणे शहर महाविकास आघाडीचे काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांची आज प्रचारादरम्यान भेट झाली. यावेळी त्यांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या. धंगेकर यांच्या प्रचारार्थ आज काँग्रेसच्या कोथरूड विधानसभा मतदारसंघातर्फे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या मेळाव्याचंही आयोजन करण्यात आलं होतं.

महायुतीचे पुण्यातील उमेदवार मुरलीधर मोहोळा यांनी आज झैनी मशिदीला भेट देऊन सर्व मुस्लिम बांधवांना रमजानच्या शुभेच्छा दिल्या.

मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी उरण विधानसभा मतदारसंघात महायुतीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक आज आयोजित करण्यात आली होती. राज्यातील मंत्री उदय सामंत यांच्यासह महायुतीतील मित्रपक्षांचे नेते यावेळी उपस्थित होते.

दरम्यान स्वराज्य सेनेनं माढा लोकसभा मतदारसंघासाठी सत्यवान ओंबासे यांची उमेदवारी जाहीर केली असून आज पुण्यात या पक्षाचा जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला. रोजगार, आरक्षण आणि आरोग्य क्षेत्राचा विकास करण्यावर पक्षाचा भर असेल, असं पक्षाचे अध्यक्ष संजय वाडकर यांनी यावेळी सांगितलं.

**फर्ग्युसन**

दोन देशांतील संबंध दृढ करण्यासाठी विद्यार्थी आदान-प्रदान कार्यक्रम महत्त्वाचा असल्याचं मत शिक्षणतज्ज्ञ डॉ. शरद कुंटे यांनी नुकतंच पुण्यात व्यक्त केलं. महाविद्यालयाच्या जर्मन विभागांतर्गत, भारत-जर्मनी यांच्यातील 35व्या विद्यार्थी आदान-प्रदान कार्यक्रमात कुंटे बोलत होते. या उपक्रमातील अनुभवांवर आधारित दोन पुस्तकांचं यावेळी प्रकाशन करण्यात आलं. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या जर्मन विभागाला यंदा 110 वर्षे पूर्ण होत आहेत.

**बाजार समिती**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. मागणी वाढल्याने बटाटा सिमला मिरची आणि हिरवी मिरचीचे भाव वाढले आहेत. पालेभाज्यांमध्ये करडई, चुका आणि अंबाडीच्या भावात

वाढ झाली. उन्हाळी रसाळ फळांना ग्राहकांकडून चांगला उठाव मिळत आहे. गुढीपाडवा सणाच्या पार्श्वभूमीवर आज फुलांची मोठी आवक झाली; शोभिवंत फुलांबरोबरच पारंपरिक फुलांनाही मागणी चांगली असल्याने भावात वाढ नोंदवण्यात आली.

**परदेशीश्वान**

परदेशातील श्वानांच्या २० प्रजाती धोकादायक आणि आक्रमक असल्याचा दावा करत त्यांच्या आयात, विक्री आणि प्रजननावर बंदी घालण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे; या निर्णयाला पुण्यातील प्राणीप्रेमी संघटनांनी आक्षेप घेतला असून पशुसंवर्धन विभागाला त्यासंदर्भातील निवेदन सादर केलं आहे. ऍनिमल रेस्क्यू ट्रस्ट या खासगी स्वयंसेवी संस्थेनं या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली असून या निर्णयाला स्थगिती देण्याची मागणी केली आहे.

**हॉटेल**

जल, वायू आणि ध्वनी प्रदूषण होत असल्याप्रकरणी पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरातील सुमारे पावणे तीनशे रेस्टॉरंट्स, हॉटेल आणि क्लब चालकांना राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळानं नोटिसा जारी केल्या आहेत. आगामी १० दिवसांत संबंधित हॉटेल आणि क्लब चालकांनी या संदर्भात उपाय योजना केल्या नाही; तर त्यांच्याविरुद्ध कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

**निवड**

पुण्याचं ग्रामदैवत असणाऱ्या श्री कसबा गणपती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी श्रीकांत शेटे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. येत्या २०२४ते २७ या कालावधीसाठी ही निवड झाली आहे.

**खोखो निवड**

महाराष्ट्र राज्य खो खो संघटनेची निवडणूक आज पुण्यातल्या महाळुंगे बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात पार पडली. यामध्ये पुण्याच्या सचिन गोडबोले यांची कार्याध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. २०२४-२०२८ या कालावधी करता ही निवड करण्यात आली आहे.

**मुष्टियुद्ध स्पर्धा**

हरियाणामधील रोहतक इथं झालेल्या मुष्टीयुद्ध स्पर्धेत पुण्यातील माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी माध्यमिक विद्यालयातील ओवी पवळे हिनं रौप्यपदक पटकावलं आहे. भारतीय मुष्टीयुद्ध महासंघ आणि भारतीय क्रीडा प्राधिकरणातर्फे या स्पर्धा घेण्यात आल्या.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान ३९ अंश तर किमान तापमान २० पूर्णांक ९ दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं; उद्याही साधारण असंच तापमान असेल आणि दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी ०६.०० वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**